महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषद, मुंबई
Maharashtra Council of Acupuncture
202, 2nd Floor, Administrative/ Superintendent office Bldg, Cama and Albless Hospital, Mahapalika Marg, Mumbai 400 001
Tel. : 022-22620376 | Email : mahacucouncil@gmail.com | Web : www.mahacucouncil.org

जा.क्र.मअंप/ ॲक्यू. अभ्यासक्रम/ शै. वर्ष-२०२५-२६/संलग्नता/४४१/२०२५ दिनांक-०३/०७/२०२५

# परिपत्रक

विषय- महाराष्ट्र ॲक्यूपंक्चर परिषदेने २०२४-२५ या वर्षी मान्यता प्रदान केलेल्या संस्थांना परिषदेची सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी मान्यता व संलग्नता प्रदान करण्याबाबत..

संदर्भ-१. महाराष्ट्र ॲक्यूपंक्चर चिकित्सा पध्दती अधिनियम २०१५
२.महाराष्ट्र ॲक्यूपंक्चर परिषद नियम २०१९
३. वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.१३७/२२ शिक्षण १ दिनांक-०५/०९/२०२४

महाराष्ट्र ॲक्यूपंक्चर परिषदेने राज्यात महाराष्ट्र ॲक्यूपंक्चर चिकित्सा पध्दती अधिनियम २०१५ मधील तरतुदीनुसार व संदर्भांकित क्र.३ च्या शासन पत्रामधील निर्देशानुसार ॲक्यूपंक्चर चिकित्सा पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यात आलेला आहे.

या अनुषंगाने सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी पात्र संस्थांना मान्यता व संलग्नता प्रदान करणे संदर्भात खालीलप्रमाणे सुचना निर्गमीत करण्यात येत आहेत.

१. महाराष्ट्र ॲक्यूपंक्चर परिषदेने अधिनियमातील तरतुदीनुसार व शासन निर्देशानुसार ज्या संस्थांना सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी प्रथमवर्ष ॲक्यूपंक्चर चिकित्सा पदविका अभ्यासक्रम सुरु करण्याची मान्यता देण्यात आलेली आहे, अशा संस्थांकडून सन २०२५-२६ चा शैक्षणिक वर्षाकरीता मान्यता व संलग्नते बाबतचे ऑनलाईन प्रस्ताव दिनांक ०५/०७/२०२५ पासून १५/०७/२०२५ पर्यंत मागविण्यात येत आहेत. प्रस्तावाची एक प्रत परिषदेस प्राचार्यांच्या सहीनिशी (प्रत्येक पानावर) हस्तपोच / पोस्टाने त्वरीत सादर करावी.

२. ज्या संस्थांना सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात ॲक्यूपंक्चर चिकित्सा पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी परवानगी देण्यात आली होती. परंतु ज्यांनी परिषदेची संलग्नता मिळण्यासाठी प्रस्ताव सादर केलेले नाहीत, अशा संस्थांनी देखील वरील कालावधीत मान्यता व संलग्नता मिळविण्यासाठीचे ऑनलाईन प्रस्ताव सादर करावेत. त्याचप्रमाणे संलग्नतेसाठीच्या संपुर्ण प्रस्तावाची एक प्रत संपुर्ण कागदपत्रांसह व प्राचार्यांच्या सही शिक्क्यानिशी परिषदेस सादर करावी. विहित मुदतीत संबंधीत संस्थांनी प्रस्ताव सादर न केल्यास त्यांना मान्यता व संलग्नता प्रदान केली जाणार नाही व त्यांचे मुळ प्रस्ताव रद्य करण्यात येतील, याची कृपया नोंद घ्यावी.

(श्री. नारायण नवले)
प्रबंधक
महाराष्ट्र ॲक्यूपंक्चर परिषद,मुंबई